| | | | | |
|---|---|---|---|---|
| **CNR No.MHST090008492014** | प्राप्त दिनांक | – २०.०९.२०१४ | | |
| | नोंदणी दिनांक | – २०.०९.२०१४ | | |
| | निकाल दिनांक | – १०.०६.२०२६ | | |
| | कालावधी | – वर्ष | महिना | दिवस |
| | | ११ | ०८ | २१ |

**भाग अ**

**कोरेगाव येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात, ता.कोरेगाव,जि. सातारा.**

(पिठासिन अधिकारी पी.डी.यवतकर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.१६४/२०१४** **निशाणी क्र. ३५**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबर अहवालचा तपशिल:** | **अपराध क्र.:** | १२०/२०१४ दिनांकः १०.०७.२०१४ |
| | **पोलीस स्टेशन:** | कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा. |

| | |
|---|---|
| **फिर्यादी:** | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस ठाणे अंमलदार,<br>कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा. |
| **आरोपी:** | **विजय छगनलाल ओसवाल**<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय– व्यापार (ज्वेलरी),<br>रा. शांतीनगर, कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा |
| **अभियोग पक्षाचे विधिज्ञ:** | सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन.एन.पवार. |
| **आरोपींचे विधिज्ञ:–** | विधीज्ञ श्री. डी.एम.बर्गे, आरोपीकरिता |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १०.०७.२०१४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १०.०७.२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २०.०९.२०१४ |
| दोषारोप निश्चितीचा दिनांक | २४.०७.२०१४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २७.११.२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १०.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०.०६.२०२६ |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिन दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपी दोषी की निर्दोष | किती शिक्षा | बंदीवान म्हणुन असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विजय छगनलाल ओसवाल | ११.०७.२०१४ | ११.०७.२०१४ | भा.द.वि. कलम ३५४अ ५०४ | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी | | | |
|---|---|---|---|
| **क्रमांक** | **नि.क्र.** | **नाव** | **साक्षीदाराचा प्रकार** |
| अ.सा.क्र.१ | २४ | परविन आयुब बागवान | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | २७ | हमीद नजीर मुल्ला | पंच |

| | | | |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.३ | २९ | अहमद इलाही बागवान | साक्षीदार |
| अ.सा.क्र.४ | ३२ | प्रशांत पांडुरंग जाधव | तपासी अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष/ आरोपी/ न्यायालयीन पुराव्यांची यादी**

| अभियोगपक्षाच्या निशाणी क्रमांकाची यादी | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | निरंक | निरंक |

| बचावपक्षाने मान्य केलेले कागदपत्रे | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | निरंक | निरंक |

| बचावपक्षाच्या निशाणी क्रमांकाची यादी | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | निरंक | निरंक |

निशाणी क्र. ३५

## अभियोग पक्ष/ आरोपी/ न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

### ब. बचावपक्षाने मान्य केलेले कागदपत्रे

| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

### क. न्यायालयातर्फे दिलेल्या निशाणी क्रमांकाची यादी

| | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
| १. | निरंक | निरंक |

### ड. मुद्देमाल

| अ.क्र. | वर्णन |
|---|---|
| १ | निरंक |

## न्या य नि र्ण य

(दि.१०.०६.२०२६ रोजी घोषित )

प्रस्तुत खटला हा आरोपी याचे विरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४अ, ५०४ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की,**

२) दिनांक १०.०७.२०१४ रोजी वर्दीदार महिला नामे परविन आयुब बागवान हिने कोरेगाव पोलिस ठाणे येथे समक्ष हजर राहून फिर्याद दाखल केली की, दिनांक १०/०७/२०१४ रोजी सकाळी ९.०० वा.चे सुमारास फिर्यादी जुना मोटार स्टॅन्ड समोर तिचे फळ विक्रीचे दुकान उघडून आत जावून दुकानाची साफसफाई करीत असताना दुकानाच्या पायरीवर कुणीतरी पान किंवा गुटखा खावुन थुंकल्याचे दिसले म्हणून सदर पायरी पाणी आणून धुतली, पाणी खाली गेल्यानंतर तिने माझे दुकान लावले. त्यानंतर फिर्यादी पुन्हा पाणी आणायला गेले व तोपर्यंत १०.०० वाजले होते. त्यावेळी त्यांचे शेजारी असलेले विजय ज्वेलर्स सराफी दुकानाचे मालक विजय छगनलाल ओसवाल हा १०.०० वा.चे सुमारास त्याचे दुकान उघडणेकरीता आला होता, त्यावेळी त्याने शेजारच्या ज्युसच्या टपरीवरील छोटूला विचारले की, पाणी कुणी टाकले. त्यावेळी त्याने सांगितले की, पायरीवर घाण केलेली होती ती पाणी टाकून भाभीने धुतली. त्यानंतर फिर्यादी तिचे दुकानाचे समोर उभी असताना व विजय ओसवाल हा त्याचे दुकानासमोर उभा असताना त्याने तिच्याकडे बघुन वाईट शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यास म्हणाले की, तु शिवीगाळ करु नको व मी काही जाणून बुजून पाणी टाकले नाही. त्यावर तो मला म्हणाला की, तु माझ्याशी बोलू नको व तुझी लायकी नाही, येथे कशाला बसतेस, मी तुला हजार रुपये देतो, माझ्या बरोबर चल. त्यावेळी फिर्यादी तिला म्हणाली की, मी पोलीसात तक्रार करणार. त्यानंतर आरोपी तिला म्हणाला की, जा तक्रार कर कोण आमचं वाकडं करत नाही. त्यानंतर फिर्यादीने आरोपी विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

३) या तक्रारीवरून कोरेगाव पोलीस स्टेशन, ता. कोरेगाव, जि. सातारा येथे गु.र.क्र. १२०/२०१४ नोंदवण्यात येवुन त्याचा पुढील तपास पो.ना.पी.जी.जाधव यांना देण्यात आला. तपासात त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले व तपासामध्ये गुन्हा घडल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे त्यांनी आरोपी विरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात हजर केले.

४) दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आल्यानंतर आरोपी हजर झाल्यावर त्यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप (नि.८) वाचून दाखवण्यात आला. त्यांनी दोषारोपपत्रामध्ये गुन्हा कबूल नाही असे सांगून अभियोगाची मागणी केली. अभिलेखावर आलेल्या पुराव्याअंति आरोपी विरुध्द पुरावा आल्यामुळे त्याचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नि.क्र.३४ वर नोंदविण्यात आला.

५) याकामी उभय पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकता व सादर करण्यात आलेला पूरावा पाहता माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| <u>अ.क्र.</u> | <u>विचारार्थ मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १०/०७/२०१४ रोजी सकाळी ९.०० वा.चे सुमारास पुसेगाव ते सातारा जाणारे रस्त्याच्या कडेला जुना मोटार स्टॅन्ड समोर कोरेगाव येथील विजय ज्वेलर्स नावचे दुकाना | |

| | | |
|---|---|---|
| | समोर फिर्यादी परवीन आयुब बागवान हिला वाईट शिवीगाळ करुन तिला तु माझ्याशी बोलू नको व तुझी लायकी नाही, येथे कशाला बसतेस, मी तुला हजार रुपये देतो, माझ्या बरोबर चल असे म्हणून लज्जास्पद भाषा बोलून आणि त्यायोगे भारतीय दंड विधा संहिता कलम ३५४(अ) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही. |
| २. | वर नमूद तारखेस, वेळेला व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान करुन शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले जेणेकरुन त्याच्याकडून सार्वजनिक शांतता भंग होईल आणि त्यायोगे भारतीय दंड विधा संहिता कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

## मुद्दे क्र. १ ते ३ करीताः–

६) प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करणेकामी पटलावर एकुण ४ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यापैकी अभियोग पक्षातर्फे सा.क्र.१ म्हणून फिर्यादी परविन आयुब बागवान हिची साक्ष नि.क्र.२४ प्रमाणे नोंदविली. फिर्यादीने तिच्या साक्षीतील सरतपासामध्ये असे कथन केले की, सन २०१४ मध्ये ती तिच्या घरी तिची

आई व मुले असे राहत होती. दि.१०/०७/२०१४ रोजी तिचे जुने मोटार स्टॅन्डवर फळाचे दुकान होते, ती सकाळी दुकान उघडायला गेली असता दुकानाच्या पायरीवर कोणीतरी घाण केली होती, त्यामुळे तिने सदर पायरी पाण्यानी धुतली, पाणी खाली गेल्यानंतर तिने तिचे दुकान लावले, त्यानंतर ती पुन्हा पाणी आणायला गेली, तोपर्यंत १०.०० वाजले होते, त्यावेळी विजय ओसवाल तेथे आला, त्याचे देखील जुने मोटार स्टॅन्ड येथे दुकान आहे, त्यावेळी त्याने शेजारच्या ज्युसच्या टपरीवरील छोटूला विचारले की, पाणी कोणी टाकले, त्यावेळी त्याने सांगितले की, पायरीवर घाण केलेली होती, ती पाणी टाकून भाभीने धुतली. त्यानंतर विजय ओसवाल याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली, त्यावेळी फिर्यादी त्याला म्हणाली की, तु शिवीगाळ करु नकोस, मी काही जाणुन बुजून पाणी टाकले नाही. त्यावर आरोपी फिर्यादीला म्हणाला की, तु माझ्याशी बोलू नको, तुझी लायकी नाही. त्याचप्रमाणे तो असे मोठयाने म्हणाला की, इथे कशाला बसते, मी तुला १००० रुपये देतो, माझ्याबरोबर चल. त्यावेळी फिर्यादी आरोपीला म्हणाले की, मी पोलीसात तक्रार करणार, त्यानंतर आरोपी म्हणाला की, जा तक्रार कर, कोण आमचं वाकड करत नाही. त्यानंतर फिर्यादीने नि.क्र.२५ प्रमाणे फिर्याद दाखल केली असे कथन केले.

७) फिर्यादीने तिच्या उलटतपासामध्ये याबाबी मान्य केल्या की, घटनेच्या दोन महिने आधी कोरेगाव मध्ये जाळपोळ झाली होती, त्यावेळी तिचा हातगाडा जमावाने जाळला होता, त्यावेळी मुस्लीम समजातील ब–याच लोकांची गाडे, दुकान गाळे जाळले

होते, तिच्या फळाच्या दुकानाच्या पश्चिमेला लगत रामापुरे यांचे फुलांचे दुकान आहे. रामापुरे यांच्या दुकानाच्या पश्चिमेला आरोपीचे ज्वेलर्सचे दुकान आहे. फिर्यादीचे व आरोपीचे दुकान रस्त्यापासून ४ ते ५ फुट उंचीवर आहे. फिर्यादी व आरोपीचे दुकान कोरेगावच्या मुख्य रस्त्यालालागून आहे, फिर्यादीच्या फ्रुट स्टॉलच्या समोरच्या बाजुला रिक्षा स्टॉप व मारुतीचे मंदीर आहे, मंदीरालागून रस्त्याकडेला भाजीपालेवाले फळ विक्रीवाले स्टॉल लावून बसलेले असतात, फिर्यादीच्या फ्रुट स्टॉलच्या समोर अक्षय इलेक्ट्रानिक हे दुकान आहे.

८) फिर्यादीने पुढे हे मान्य केले की, दि.१०/०७/२०१४ रोजी सकाळी १०.०० वा.चे सुमारास दुकानासमोरील रस्त्यावरुन लोकांची ये–जा चालू होती, फिर्यादीच्या फळाच्या दुकानाच्या पुर्वेस लगत छोटूची ज्युसची टपरी होती, घटनेपूर्वी रामापुरे यांचा स्टॉल उघडलेला होता, सदर घटना छोटूने पाहिली होती. त्याचप्रमाणे येणा–या जाणा–या लोकांनी देखील घटना पाहिली होती. घटना घडली त्यावेळी रामापुरे दुकानात नव्हते. पोलीसांना जबाब देताना छोटू व आत्याने घटना पाहिल्याचे सांगितले होते, परंतु त्यांची नावे फिर्यादीच्या जबाबामध्ये नमूद नाही. फिर्यादीच्या दुकानापासून कोरेगाव पोलीस स्टेशनला चालत जायला २ ते ३ मिनीटे लागतात, तर फिर्यादीला दुकानापासून घरी जायला ४ ते ५ मिनीटे लागतात. आरोपीचे व फिर्यादीचे दुकान घटनेपूर्वी अनेक वर्षापासून शेजारी शेजारी आहेत. घटनेपूर्वी आरोपीने कधीही फिर्यादीकडे वाईट नजरेने पाहिले नाही, फिर्यादी व आरोपी वेगवेगळया समाजातील आहेत, पायरी धुतलेले

पाणी आरोपीच्या दुकानात गेले नव्हते, आरोपीने फिर्यादीचे नाव घेवून शिवीगाळ केली नव्हती. परंतु फिर्यादीने तिला तिच्या उलटतपासात विचारलेल्या सर्व उत्तर सूचक प्रश्नांची उत्तरे तिने नकारार्थी दिली व हे नाकारलेले की आरोपीने तिचा गाडा जाळला अशी तिची समजूत झाल्याने तिने आरोपी विरुध्द खोटी तक्रार दाखल केली.

९) साक्षीदार क्र.२ हमीद नजीर मुल्ला हा घटनास्थळावरील पंच असून त्यांची साक्ष अभियोग पक्षातर्फे नि.क्र.२७ वर नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांचे सरतपासात त्यांना पोलीसांनी घटनास्थळी पंचनामाकरणेकरीता बोलवल्याचे व त्यांचे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा नि.क्र.२८ प्रमाणे केल्याचे कथन केले. सदरील साक्षीदाराने त्याचे उलटतपासामध्ये याबाबी मान्य केल्या की, तो फळाचा व्यापार साखळी पुलाजवळ करतात, हनुमान मंदीर हे पूर्वेकडे तोंड करुन आहे, हनुमान मंदीरासमोर आसरेकडे व पुसेगावकडे जाणारा रस्ता आहे, घटना ठिकाण हनुमान मंदीराच्या समोर नव्हते, घटना ठिकाणी गुन्हा घडला अशा खाणाखुणा नव्हत्या, पंचनाम्याकरीता फिर्यादीने बोलाविले होते, फिर्यादी व ते एकाच समाजातील आहे व धंदयामुळे त्यांचे चांगले संबंध आहेत, फिर्यादीचे दुकान सातारा–पुसेगाव रस्त्याच्या दक्षिण बाजुला आहे, मारुतीचे मंदीर उत्तरेला आहे.

१०) साक्षीदार क्र.३ म्हणून अहमंद इलाही बागवान यांची साक्ष नि.क्र.२९ प्रमाणे नोंदविली. सदरील साक्षीदाराने फिर्यादी त्याची बहीण असल्याचे सरतपासात सांगितले,

त्याचे फळ विक्रीचे दुकान जुना मोटार स्टॅन्डवर असल्याचे त्याचप्रमाणे घटनेच्यावेळी बहिणीच्या दुकानाच्या पायरीवर कोणीतरी गोवा गुटखा खावून थुकले होते, त्यावेळी बहिणीने पाणी टाकून धुवून टाकले होते, त्यावेळी त्याच्या बहिणीचे तिच्या शेजारी असलेल्या विजय ओसवाल याच्या बरोबर बाचाबाची झाली होती, पाणी मारत असताना पाणी त्याच्या दुकानात गेल्यामुळे तो बहिणीला शिवीगाळ करत होता व बडबडत होता. त्यावेळी त्याची बहिण त्याला म्हणाली की, तु शिव्या देवू नकोस, मुद्दाहून केले नाही, त्यावेळी आरोपी त्याच्या बहिणीला म्हणाला की, तु तर बोलू नकोस, तुझी बोलायची लायकी नाही. त्यानंतर विजय ओसवाल व त्याचे वडील आमच्या घरी आले होते, बहिणीने केलेली तक्रार मागे घेण्याचे सांगत होते व त्याबाबत पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

११) सदरील साक्षीदाराने त्याचे उलटतपासामध्ये याबाबी मान्य केल्या की, घटनेच्या १ ते २ महिन्याआधी कोरेगाव मध्ये जाळपोळ झाली होती, त्यावेळी परविनच्या गाडयाचे व इतर मुस्लीम समाजातील लोकांच्या वस्तीचे नुकसान झाले होते. सदरील घटनेबाबत त्यांना १० ते १५ मिनीटाने कळाले, सदरील बाब त्यांना आरोपी व त्याच्या वडीलांकडून समजली, घटना त्यांच्या समक्ष झाली नाही, घटनेमध्ये काय शिव्या दिल्या हे त्यांना माहित नसल्यामुळे त्यांनी पोलीसांना सांगितले नव्हते. आरोपीचे व त्यांचे दुकान रस्त्यापासून उंचीवर आहे, त्यांच्या दुकानाजवळ ओतलेले पाणी किंवा रस्त्यावर ओतलेले पाणी आरोपीच्या दुकानात जात नाही. त्याचप्रमाणे त्यांनी ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष

दिली. परंतु सदरील साक्षीदाराने त्याला आरोपीच्या वकीलांनी उलटतपासामध्ये विचारलेल्या इतर सर्व उत्तर सूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली व तो खोटी साक्ष देत असल्याचे नाकारले.

१२) अभियोग पक्षातर्फे तपासी अधिकारी सा.क्र.४ म्हणून प्रशांत पांडुरंग जाधव यांना नि.क्र.३२ प्रमाणे साक्ष नोंदविली. त्यांनी त्यांच्या साक्षी मध्ये दि.१०/७/२०१४ रोजी ते कोरेगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणून काम करत असल्याचे, त्यांच्याकडे सदरील गुन्हयाचा तपास लेखी आदेशाने आल्याचे त्याप्रमाणे त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केल्याचे, साक्षीदारांची साक्ष नोंदविल्याची, पुरावा मिळून आल्यानंतर दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले.

१३) सदरील साक्षीदाराने उलटतपासामध्ये याबाबी मान्य केले की, घटनास्थळ ते कोरेगाव पोलीस स्टेशनचे अंतर अंदाजे १५० ते २०० मीटर इतके आहे, घटनास्थळ कोरेगाव शहरातील मुख्य रस्त्यावर आहे, घटनास्थळाच्या बाजुला हनुमान मंदीर आहे, घटनास्थळाच्या डाव्या बाजुला, उजव्या बाजुला व समोर दुकाने आहेत, घटना दि.१०/०७/२०१४ रोजी सकाळी ९.०० वाजता घडली, तर त्याबाबत फिर्याद संध्याकाळी ७.१० वाजता दिली. फिर्याद दाखल करण्यास झालेल्या उशीराबाबत फिर्यादीने तपासामध्ये कोणतेही कारण सांगितले नाही, घटनास्थळ मुख्य रस्त्यापासून ४ ते ५ फुट उंच होते, सदरील घटनेपूर्वी हिंदू-मुस्लीम समाजामध्ये दंगल झाली होती व

त्यामध्ये कोरेगाव शहरामध्ये जाळपोळ झाली होती. परंतु सदरील साक्षीदाराने इतर सर्व उत्तर सूचक प्रश्नांची उत्तरे नाकारलेली आहेत व खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केल्याचे नाकारले आहे.

१४) अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या सर्व साक्षीदारांची साक्ष याठिकाणी पाहिली असता, अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द हे सिध्द करणे आवश्यक आहे की, घटनेच्यावेळी दि.१०/०७/०१४ रोजी ९.०० वा.चे सुमारास आरोपीने फिर्यादीला वाईट शिवीगाळ करुन, तुला मी १००० रुपये देतो तु माझ्यासोबत चल असे म्हणून भारतीय दंड विधा संहिता कले ३५४अ व ५०४ अन्वये गुन्हा केला.

१५) सदरील प्रकरणामध्ये याठिकाणी फिर्यादीने तिच्या साक्षी मध्ये घटनेच्यावेळी तिने तिच्या दुकानाची पायरी पाणी आणुन धुतली, त्यावेळी विजय ओसवाल याने तिला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली, त्यावेळी फिर्यादी आरोपीला शिवीगाळ करु नकोस असे म्हणाली असता, त्यावर आरोपीने तु माझ्याशी बोलू नकोस, तुझी लायकी नाही, त्याचप्रमाणे इथे कशाला बसते, तुला १००० रुपये देतो, तु माझ्यासोबत चल असे म्हणाल्याचे कथन केले आहे. तथापी, संपूर्ण पुराव्याचे परीक्षण करता असे निदर्शनास येते की, घटना गर्दीच्या ठिकाणी, मुख्य रस्त्यावर, अनेक दुकाने व लोकांच्या वर्दळीच्या ठिकाणी घडल्याचे फिर्यादीने मान्य केले आहे. फिर्यादीने कबूल केले आहे की, छोटू, रामापुरे तसेच येणारे–जाणारे लोक घटना पाहत होते, तथापी अभियोग पक्षाने छोटू किंवा

इतर कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे तयांच्या साक्षीचा लाभ अभियोग पक्षास मिळालेला नाही. फिर्यादीचे भाऊ अहमद इलाही बागवा हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यांनी घटना स्वतः पाहिलेली नसल्याचे स्पष्ट सांगितले आहे. त्यामुळे त्यांची साक्ष ऐकीव स्वरुपाची ठरते.

१६) फिर्यादीने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, घटना होण्यापूर्वी आरोपीने तिच्याकडे कधीही वाईट नजरेने पाहिले नव्हते, फिर्यादी व आरोपी यांची दुकाने अनेक वर्षापासून शेजारी आहेत, तिच्या दुकानातून गेलेले पाणी आरोपीच्या दुकानात गेले नव्हते यावरुन घटनेची सुरुवात झालेल्या कारणाबाबत शंका निर्माण होते. तसेच, घटना सकाळी सुमारे ९.०० वाजता घडली असताना तक्रार सायंकाळी ७.१० वाजता दाखल करण्यात आली, पोलीस स्टेशन घटनास्थळापासून १५० ते २०० मीटर अंतरावर असल्याचे तपासी अधिकारीने मान्य केले आहे. या विलंबाचे समाधानकारक स्पष्टीकरण अभिलेखावर उपलब्ध नाही.

१७) तसेच सदर प्रकरणात अभियोग पक्षाने असे सिध्द करणे आवश्यक होते की, आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली आणि ''माझ्यासोबत चल, मी तुला एक हजार रुपये देईन'' हे शब्द उचारले तरीही सदर शब्दांचा अर्थ लैंगिक सवलतीची मागणी किंवा विनंती असा होत आहे हे ठोसपणे शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने कोणताही पुरावा पटलावर आणलेला नाही. सदरील विधान जरी अयोग्य आणि आक्षेपार्ह असले तरी त्यातील लैंगिक

हेतूबद्दल स्पष्ट पुरावा पटलावर आलेला नाही. सदरील शब्द ते स्वतःहून स्पष्टपणे लैंगिक मागणी दर्शवत नाहीत.

**१८)** सदरील भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४अ हा गुन्हा सिध्द करणेसाठी खालीलप्रमाणे एखादया पुरुषाने कृत्य केल्यास तो लैंगिक छळाच्या गुन्हयात दोषी ठरतो.

१) महिलेच्या इच्छेविरुध्द शारीरीक संपर्क साधून लैंगिक स्वरुपाचे संकेत किंवा प्रस्ताव देणे,
२) लैंगिक बाबीची (sexual favour) मागणी करणे किंवा तशी विनंती करणे,
३) महिलेच्या इच्छे विरुध्द अश्लील साहित्य (pornography) दाखविणे,
४) लैंगिक स्वरुपाच्या अश्लील किंवा सूचक टिपणी (sexual coloured remarks) करणे

**१९)** वरीलप्रमाणे कलम ३५४अ मधील बाबींचे अवलोकन केले असता व पटलावरील पुरावा पाहिला असता आरोपी विरुध्द कलम ३५४अ गुन्हा सिध्द होणेकामी जरी फिर्यादीने याठिकाणी आरोपीने तिला माझ्यासोबत चल, तुला एक हजार रुपये देतो असे जरी शब्द उचारले असले तरी केवळ या शब्दांच्या आधारे आरोपीने फिर्यादीकडे कोणतीही लैंगीक हेतुने मागणी केल्याचे दिसून येत नाही. सदरील कलम ३५४अ हा गुन्हा लागू होण्यासाठी आरोपीचे वर्तन हे लैंगीक स्वरुपाचे असणे, लैंगीक हेतुने मागणी करणे

किंवा लैंगीक आशयाची टिपणी करणे आवश्यक असते. सदर प्रकरणामध्ये आरोपीने वापरलेल्या शब्दात कोणताही स्पष्ट लैंगीक उल्लेख आढळून येत नाही.

२०) अभियोग पक्षातर्फे कोणताही स्वतंत्र पुरावा पटलावर आला नाही, ज्यावरुन आरोपीचा उद्देश फिर्यादीकडून लैंगीक स्वरुपाचा प्रस्ताव ठेवला गेला होता. त्यामुळे केवळ माझ्या सोबत चल, मी तुला एक हजार रुपये देतो या शब्दावरुन आरोपीचा लैंगीक हेतु निश्चितपणे सिध्द होत नाही. त्यामुळे उपलब्ध पुराव्यावरुन आरोपीचे कृत्य भारतीय दंड संहिता कलम ३५४ अ अन्वये लैंगीक छळाच्या व्याख्यात येत नाही, त्यामुळे कलम ३५४अ चे आवश्यक घटक अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुध्द संशयाच्या पलीकडे सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपीला सदरील कलमाखाली दोषी धरता येणार नाही.

२१) त्याचप्रमाणे फिर्यादीने तिच्या पुराव्यामध्ये आरोपीने तिला शिवीगाळ केली असल्याचे देखील कथन केले आहे, परंतु फिर्यादीने तिच्या उलटतपासामध्ये आरोपीने तिला काय शिवीगाळ केली होती याबाबत कोठेही नमूद केले नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही साक्षीदाराने देखील आरोपीने फिर्यादीला काय शिवीगाळ केली याबाबत कोणतेही कथन केले नाही. फक्त आरोपीने शिवीगाळ केली हे म्हणणे याठिकाणी फिर्यादीच्या म्हणण्याला दुजोरा देत नाही. त्यामुळे घटनेच्यावेळी आरोपीने फिर्यादीस जाणीवपूर्वक शिवीगाळ केली व त्यायोगे तिचा अपमान करण्याकरीता व त्या अपमानामुळे फिर्यादीच्या शांततेचा भंग झाला असे याठिकाणी दाखविणारा कोणताही पुरवा पटलावर आला नाही. कोणत्याही साक्षीदाराने

फिर्यादीला आरोपीने नेमकी काय शिवीगाळ केली याबाबत सांगितलेले नाही. करीता भारतीय दंड विधान संहिता कलम ५०४ अन्वये गुन्हा केल्याचे संशयाच्या पलीकडे जावून सिध्द केले नाही.

२२) करीता अभियोगपक्षाचा वरील पुरावा पाहता आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याकीरता असणा–या बाबी या अभियोगपक्षाने संशययापलीकडे सिध्द केल्या नाहीत. करीता आरोपीला सदरील प्रकरणातून निर्दोष मुक्त करणे न्याय व योग्य आहे. सबब, मी **मुद्दे क्र.१ व २** चे उत्तर **नकारार्थी** देवून, मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **विजय छगनलाल ओसवाल** याची भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३५४(अ) व ५०४ या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– चे जामिन व बंधपत्र द्यावे.

(*न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.*)

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2026.06.10 17:40:57 +0530

दिनांक – १०/०६/२०२६
कोरेगाव

**( पी.डी.यवतकर )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोरेगाव,
ता.कोरेगाव, जि.सातारा.